मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :३१ | रविवार दि.०२ नोव्हेंबर ते शनिवार ०८ नोव्हेंबर २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ — संपादकीय — भीक नको पण...
पान ३ — 'प्रभावी राजकीय प्रतिनिधित्वासाठी जैन युवकांनी..
पान ४ — वसई–विरारमध्ये भूमाफियांचा धुमाकूळ!

## वसई–विरारचा नळ घोटाळा? -'१२ नळ, १२ लाखांचा खेळ!'

## वालीव प्रभागातील पाणीपुरवठा विभागावर भ्रष्टाचाराचे आरोप; व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये संताप

वसई–विरार (प्रतिनिधी): वसई–विरार शहर महानगरपालिकेच्या वालीव प्रभागातील केलीचा पाडा, राजीवली, भोयदापाडा परिसरात नळ जोडणीसाठी बेकायदेशीर वसूली होत असल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत.

या संदर्भातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यामध्ये काही व्यक्ती १२ नळ जोडण्यांसाठी १२ लाख रुपये घेतल्याची कबुली देताना दिसत असल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे.

व्हिडिओ व्हायरल – नागरिकांच्या शंका वाढल्या

व्हिडिओमध्ये नळ जोडणी संदर्भातील आर्थिक व्यवहाराची चर्चा होताना दिसते, अशी चर्चा परिसरात रंगली आहे.

स्थानिक रहिवाशांनी सांगितले की —'एका नळासाठी तब्बल ९० हजार रुपये मागितले गेले.

आम्ही महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे चौकशीसाठी गेलो असता, अधिकारी वारंवार टाळाटाळ करतात.'

नागरिकांच्या मते, पाणीपुरवठा विभागात भ्रष्टाचाराचे जाळे खोलवर रुजले आहे, आणि सामान्य नागरिकांना नियमित नळ जोडणी मिळवण्यासाठी अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे.'पाणी हक्क आहे, लाच नाही!'या प्रकरणामुळे स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.'पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे.नळ जोडणी मिळवण्यासाठी पैसे मागणे म्हणजे नागरिकांच्या हक्काची गळचेपी आहे,'

असे एका स्थानिक रहिवाशाने सांगितले.या प्रकरणाची संपूर्ण आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

त्यांनी वसई–विरार महानगरपालिकेचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, तसेच पाणीपुरवठा विभागप्रमुख व संबंधित प्रभाग अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे.'जर खरोखरच व्हिडिओमधील व्यवहार सत्य असेल, तर संबंधितांवर भारतीय न्याय संहितेनुसार (BNS) कठोर कारवाई व्हावी.'

या प्रकरणाची

पान नं.२वर

## वसई प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालशाहीचा सुळसुळाट?

### 'अधिकारी काम करतात की दलाल?' — नागरिकांचा संतप्त सवाल

वसई प्रतिनिधी:वसई येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरु असलेली अनियमितता, दलालांचा वावर आणि माहिती अधिकार कायद्याकडे दुर्लक्ष या मुद्द्यांवरून नागरिक आणि सामाजिक संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या कार्यालयात 'प्रशासनापेक्षा दलालच जास्त प्रभावी' असल्याची चर्चा सर्वसामान्यांमध्ये रंगली आहे.

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की RTO कार्यालयात कामकाज पूर्णपणे दलालांवर अवलंबून झाले आहे.परवाना, नोंदणी, अथवा वाहन तपासणीसाठी येणाऱ्या नागरिकांना थेट अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणे कठीण झाले आहे.'दलालच दस्तऐवज हाताळतात, तर मग अधिकाऱ्यांची भूमिका काय?'

असा सरळ सवाल नागरिक करत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कार्यालयातील सार्वजनिक माहिती अधिकारी आणि प्रथम अपील अधिकारी यांनी माहिती अधिकार **RTI** अंतर्गत आलेल्या अर्जांकडे दुर्लक्ष केल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

काही अर्जांना निर्धारित कालावधीत उत्तर न दिल्यामुळे माहिती लपविण्याचा प्रकार असल्याची शंका नागरिक व्यक्त करत आहेत.

'माहिती अधिकार कायदा हा पारदर्शकतेचा आधार आहे,

पण वसई **RTO** मध्ये त्यालाच गभीरतेने घेतले जात नाही,'

असे एका सामाजिक कार्यकर्त्याने सांगितले.

पान नं.२वर

## वसई-विरार महानगरपालिकेतील ठेकेदारांकडून गंभीर गैरव्यवहार उघड — कामगारांचे हक्क हिरावले; आयुक्त मौन, ACB आणि ED चौकशीची मागणी.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या **(VVMC)** घनकचरा व्यवस्थापन विभागात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार आणि कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे माहिती अधिकार अधिनियम **(RTI)** अंतर्गत मिळालेल्या अधिकृत उत्तरातून उघड झाले आहे. ही माहिती **VVMC** च्या माहिती अधिकार विभागातून अधिकृतरीत्या प्राप्त झालेली असल्याने हा कोणताही आरोप नसून प्रत्यक्ष सत्यस्थिती आहे. म्हणजेच हे ठेकेदारांवर किंवा **VVMC** च्या अधिकाऱ्यांवर केलेले आरोप नसून, महानगरपालिकेच्या स्वतःच्या




कागदपत्रांमधून उघड झालेली वस्तुस्थिती आहे. RTI उत्तरानुसार सन २०१७ ते २०२४ या कालावधीत घनकचरा व्यवस्थापनासाठी नियुक्त ठेकेदारांनी गंभीर त्रुटी आणि कायदेशीर उल्लंघन केल्याचे समोर आले आहे. या कालावधीत ठेकेदारांनी मजूर, मुकादम आणि वाहनचालकांचे **PF, ESIC, PT, MLWF** तसेच Workmen **Compensation Insurance** भरलेले नाही. संबंधित कामगारांचे नियुक्तीपत्र, ओळखपत्र, आधार व पॅन कार्ड, पोलीस पडताळणी प्रमाणपत्र, ग्रुप इन्शुरन्स कागदपत्रे आणि लेबर लायसन्स काढलेले नाहीत. मृत, विकलांग व निवृत्त झालेल्या कामगारांची यादी आणि मृत्यु प्रमाणपत्रे ठेकेदारांनी सादर केलेली नाहीत तसेच त्यांना देय असलेली ग्रॅज्युटी रक्कम देण्यात आलेली नाही. मजूर, मुकादम व चालकांची बायोमेट्रिक हजेरी, पे-रोल मस्टर, बोनस मस्टर आणि लीव्ह सॅलरी मस्टर यांची नोंद सुद्धा सादर करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या कॉम्पॅक्टर, डंपर, टिपर वाहनांचे **RTO** कागदपत्रे, फिटनेस सर्टिफिकेट, ग्रीन टॅक्स, विमा व स्थ देखील उपलब्ध नाहीत. इतक्या गंभीर त्रुटी असूनही संबंधित ठेकेदारांना महानगरपालिकेकडून नियमितपणे बिले मंजूर करून पेमेंट करण्यात आले आहे. टेंडरच्या अटींनुसार सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केल्याशिवाय बिल पास होऊ नये असे स्पष्ट नमूद असूनही, ठेकेदारांचे देयक मंजूर करण्यात आले आहे. यावरून हे स्पष्ट होते की ठेकेदार आणि महानगरपालिकेच्या आरोग्य निरीक्षक, घनकचरा अधिकारी तसेच लेखा विभागातील काही अधिकारी यांच्या संगनमताने शासन निधीचा अपव्यय करण्यात आला आहे. हा प्रकार केवळ आर्थिक भ्रष्टाचाराचा नसून, कामगारांच्या मूलभूत अधिकारांवर अन्याय करणारा आहे.

वरील सर्व प्रकार हे भारतीय दंड संहिता **(IPC)** अंतर्गत गुन्हेगारी विश्वासभंग **(Criminal Breach of Trust)** आणि फसवणूक (Fraud) या गंभीर गुन्ह्यांत मोडतात. तरीदेखील **VVMC**

पान नं.२वर

# संपादकीय...!

## भीक नको पण...

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी झाली, पण आज हा आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातातील कठपुतळी बनला आहे. अनेक प्रकरणांत पीडित महिलांच्या बाजूने उभे राहण्याऐवजी आयोगाने आरोपींचे समर्थन केले, हे दुर्दैवी आहे.महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी झाली, पण आज हा आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातातील कठपुतळी बनला आहे. अनेक प्रकरणांत पीडित महिलांच्या बाजूने उभे राहण्याऐवजी आयोगाने आरोपींचे समर्थन केले, हे दुर्दैवी आहे.महिला आयोगाची स्थापना होण्यापूर्वी समाजमाध्यमे नसल्याच्या काळामध्ये महाराष्ट्रातील जनतेकडून महिला आयोग कसा असावा? या संदर्भात सूचना मागविण्यात आल्या होत्या. ५० हजारहून अधिक सूचना यावेळी नागरिकांकडून आल्या होत्या आणि २५ जानेवारी १९९३ रोजी 'महाराष्ट्र राज्य महिला आयोग' अध्यादेश काढून स्थापन करण्यात आला. या कायद्यांतर्गत आयोगाचे अध्यक्ष ही महिलांच्या कल्याणासाठी जिने स्वतःला वाहून घेतले आहे, अशी एक मान्यवर महिला असेल असे नमूद केले आहे. अलीकडे या पदावरची व्यक्ती ही सत्ताधाऱ्यांच्या आणि प्रशासकीय यंत्रणेच्या हातातील कठपुतळी झाली असल्याचे अनुभवायला येते आहे. सदर पदावर विशिष्ट पक्षाची व्यक्ती नेमली जावी असे कुठेही नमूद केलेले नसताना महिला आयोगाच्या स्थापनेपासून हे पद सत्ताधारी राजकीय पक्षात अध्यक्ष होण्यापूर्वी सक्रिय महिलेला किंवा त्यांच्याशी संबंधित व त्यांना पाठबळ देणाऱ्या महिलेलाच मिळाले आहे. त्यामुळे महिला आयोग अस्तित्वात येतानाच आयोगाच्या उद्दिष्टामध्ये जरी म्हटले असले की स्त्रियांना मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी आणि समाजातील महिलांचा दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्यासाठी, राज्याच्या धोरणांची आणि विशेषतः मार्गदर्शक तत्त्वानुसार तत्त्वे अंमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांना दुरुस्त करण्यासाठी स्त्रीविषयक कायद्यांची नीटपणे अंमलबजावणी होईल आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारेल, उंचावेल या सर्व गोष्टी संबंधित बाबीवर शासनाला सल्ला देण्यासाठी या आयोगाची निर्मिती झालेली आहे. तरी हा आयोग प्रभावीपणे स्त्रियांच्या बाजूने उभा राहताना दिसला नाही.काही सन्माननीय अध्यक्षांच्या कार्यकालात स्त्रीविषयक अनेक गंभीर गुन्ह्यांच्या बाबतीत महिला आयोगाने बजावलेली भूमिका ही ऐतिहासिक राहिलेली आहे. मधल्या काळात अनेक वर्षे महिला आयोग अस्तित्वात नव्हता आणि पुन्हा एकदा या पाच वर्षांत महिला आयोग अस्तित्वात आला आहे. सत्ताधाऱ्यांनी जशी महामंडळे वाटून घेतली तसा हा महिला आयोग आणि अध्यक्षपद राजकीय बनले आणि नीतिशून्य, फौजदारी गुन्हेगारीची पार्श्वभूमी असणाऱ्या आमदार, त्यांचे ठेकेदार आणि पोलीस यंत्रणा यांना पाठीशी घालून आरोपीला निर्दोषमुक्त करण्यासाठी ढालीसारखा महिला आयोगाचा वापर सुरू झाला. कोपर्डीचे प्रकरण असो की बदलापूर येथील शाळेतील मुलींवर झालेला अत्याचार असो, वैशाली हगवणेची आत्महत्या असो की डॉ. संपदा मुंडेचा संशयास्पद मृत्यू असो, या सर्व घटनांच्या वेळी महिला आयोगाकडे आशेने पाहणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेची निराशा झाली आहे. महिला आणि बालिकांच्या संदर्भातील लैंगिक अत्याचार आणि फौजदारी स्वरूपातील गुन्हे संबंधित कायद्यात आणि सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचना धाब्यावर बसवून सत्ताधाऱ्यांना, पोलीस प्रशासनाला आणि आरोपींना निर्दोष सुटण्यासाठी महिला आयोगाचा आणि असणाऱ्या अधिकाऱ्याचा गैरवापर होत आहे. स्वतःला असे वापरू देणाऱ्या महिलांनाच महिला आयोगाचे अध्यक्षपद आणि सदस्यत्व मिळते असे म्हटले तर वावगे ठरू नये. महाराष्ट्रात बिघडलेल्या राजकीय परिस्थितीत महिला आयोगही स्वतःची नैतिकता हरवून बसला आहे. पीडित महिलेच्या कुटुंबीयांना भेटून सहवेदना व्यक्त करण्याचा संकेत महाराष्ट्राच्या महिला आयोगाच्या इतिहासात आतापर्यंत पाळला गेला होता. परंतु हा संकेत मोडून टाकून प्रसिद्धी माध्यमांसमोर येऊन आरोपींच्या बाजूने आणि सत्ताधाऱ्यांना खुश करून पॉलिटिकल मायलेज घेऊ इच्छिणाऱ्या महिला आयोगाच्या सध्याच्या अध्यक्षा पीडितेचे जाहीरपणे चारित्र्यहनन करताना दिसल्या, तेव्हा खरोखरच प्रश्न पडला हाच का सावित्रीमाईचा पुरोगामी महाराष्ट्र? आणि हीच का ती सक्षम महिला? जी भ्रष्टाचारी, नीतिशून्य गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या राजकारण्यांच्या हातातली कठपुतली बनलेल्या महिला आयोगाच्या अध्यक्षा? प्रशासकीय कामकाजाच्या बाबतीत सत्ताधाऱ्यांचे, पोलिसांचे ऐकत नाहीत म्हणून ज्या तरुण महिला अधिकारीला स्वतःचा जीव गमवावा लागला (आत्महत्या करावी लागली किंवा तिचा काटा काढला गेला) त्या तरुण महिला अधिकाऱ्याप्रमाणेच आपण महिला आयोगाची अध्यक्षा म्हणून आपल्या आयोगासह स्वतःला वापरू देतो, आरोपींना पाठबळ देतो, पीडितेचे चारित्र्य हनन करतोय. कणखरपणे या सगळ्यांना फैलावर न घेता तपासामध्ये 'दूध का दूध, पानी का पानी' झालं पाहिजे. पीडितेच्या संदर्भात घडलेले सत्य बाहेर आले पाहिजे, तिचा आणि तिच्या कुटुंबाचा न्याय झाला पाहिजे, असे ठणकावून न सांगता तिच्या चारित्र्याचे वाभाडे काढण्याचे महिला आयोगाच्या अध्यक्षांचे वर्तन हे प्रचंड चीड आणणारे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या त्या मार्गदर्शक तत्त्वांनाही तिलांजली देत होत्या; पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासाला काळीमा फासत होत्या. महाराष्ट्रातील महिलांना आणि संबंधित युवतीच्या कुटुंबीयांना न्यायाची 'भीक नको, पण कुत्रा आवर' अशी म्हणायची वेळ आली आहे.तातडीने महिलांच्या बाजूने भूमिका घेण्याची नैतिकता नसणारा हा महिला आयोग बरखास्त करावा. पीडितेचे चारित्र्यहनन केले म्हणून तातडीने महिला आयोगाच्या अध्यक्षांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी महाराष्ट्रातील समस्त महिला मंडळ, बचत गट, महिला संघटना यांनी पुढे आले पाहिजे आणि महाराष्ट्राच्या महिला आयोगाच्या स्त्रीविरोधी अध्यक्षांना घरी बसविले पाहिजे. पीडितेचा न्याय करणे हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच या महिला आयोगाच्या अध्यक्षाला धडा शिकवणे ही गोष्ट महत्त्वाची बनली आहे. काळ सोकावता कामा नये म्हणून पोलिसांनी सदर महिला आयोगाच्या अध्यक्षांविरुद्ध गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये महिला आयोगाच्या अध्यक्षांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी झाली पाहिजे. भविष्यकाळात पुरोगामी महाराष्ट्रात महिला आयोगाच्या कोणत्याही महिला अध्यक्षांना एवढा मस्तवालपणा करण्याची हिंमत होता कामा नये, असा धडा देण्याची ऐतिहासिक जबाबदारी आपल्यावर आली आहे. पीडित तरुणीच्या कुटुंबीयांच्या प्रति सहवेदना व्यक्त करत असताना महाराष्ट्रातील समस्त संवेदनशील महिला आणि नागरिकांच्या वतीने महिला आयोगाच्या अध्यक्षांनी त्या तरुणीचे चारित्र्यहनन केले याबद्दल आम्ही त्या कुटुंबीयांची माफी मागतो. असली लाजिरवाणी वेळ आमच्यावर येण्यापेक्षा असला आयोग नसलेलाच बरा, अशी आमची धारणा आहे.

## वसई–विरारचा नळ घोटाळा? -'१२ नळ, १२...पान नं.१

सत्यता तपासून, जर कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर शिस्तभंगात्मक आणि फौजदारी कारवाई करण्याची मागणी होत आहे.स्थानिक प्रशासनाने पारदर्शक चौकशी करून नागरिकांचा विश्वास परत मिळवणे अत्यंत आवश्यक आहे, अशी भावना व्यक्त केली जात आहे.वालीव प्रभागातील केलीचा पाडा–राजीवली–भोयदापाडा परिसरातील नळ जोडणी प्रकरण आता वसई–विरारच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. 'पाणी हक्क आहे — लाच नाही,' या घोषवाक्याखाली नागरिक आता भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवू लागले आहेत.

## वसई-विरार महानगरपालिकेतील ठेकेदारांकडून...पान नं.१

चे आयुक्त मौन बाळगून असल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. आयुक्तांचे मौन हे संशयास्पद असल्याची भावना नागरिक आणि सामाजिक संघटनांमध्ये निर्माण झाली आहे.या प्रकरणातील ठेकेदारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत — अनंत एंटरप्रायजेस, उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर, रेनबो एंटरप्रायजेस, दिनेश संखे, हेना एंटरप्रायजेस, साई गणेश एंटरप्रायजेस, मंदीप एंटरप्रायजेस आणि आर. बी. इन्फ्रा. या ठेकेदारांनी कायद्याच्या विविध अटींचे उल्लंघन करून शासन आणि कामगारांच्या विश्वासाला तडा दिला आहे.स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया नोंदवली असून, त्यांनी कामगार आयुक्त पालघर, **Anti-Corruption Bureau** (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) तसेच **Enforcement Directorate** (अंमलबजावणी संचालनालय) यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच आगामी महिन्यात निघणाऱ्या घनकचरा व्यवस्थापनाच्या निविदांमध्ये या भ्रष्ट ठेकेदारांना कायमस्वरूपी सहभागी होण्यास बंदी घालावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.ही माहिती **VVMC** च्या अधिकृत उत्तरातून मिळालेली असल्यामुळे हा कोणताही राजकीय किंवा वैयक्तिक आरोप नसून प्रत्यक्ष सत्य आहे. या प्रकरणामुळे प्रशासनातील पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे **Anti-Corruption Bureau** आणि **Enforcement Directorate** यांनी तातडीने चौकशी करून जबाबदार अधिकारी आणि ठेकेदारांवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## वसई प्रादेशिक परिवहन कार्यालयात... पान नं.१

या कार्यालयात कार्यरत असलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी ओळखपत्र **ID** कार्ड परिधान न केल्याचे नागरिकांच्या लक्षात आले आहे.त्यामुळे 'कोण अधिकारी आणि कोण दलाल' हे समजणेच कठीण झाले आहे.हे चित्र शासकीय कार्यालयाच्या सुरक्षिततेवर आणि पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचे नागरिकांचे मत आहे.नागरिक आणि सामाजिक संघटनांनी या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.त्यांनी परिवहन मंत्री आणि विभागीय आयुक्त यांनी या भ्रष्टाचाराविरोधात तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.'RTO कार्यालय हे नागरिकांसाठी सेवा केंद्र आहे,पण ते दलालांसाठी कमाईचे ठिकाण बनले,हे प्रशासनासाठी लज्जास्पद आहे,'असा नागरिकांचा संताप व्यक्त होत आहेवसई प्रादेशिक परिवहन कार्यालय हे परिसरातील हजारो नागरिकांसाठी आवश्यक सेवा देणारे केंद्र आहे. मात्र, दलालशाही, अनियमितता आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे या कार्यालयावरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होत आहे.प्रशासनाने जर योग्य वेळी कारवाई केली नाही, तर **RTO** म्हणजे दलालांचे कार्यालय' असा

## निवडणुकांबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार... पान नं.४

मुद्द्यावर चर्चा केली. प्रस्तावित एलोवेटेड रेल्वे कॉरिडॉरचा मुद्दा संसदेत उपस्थित करण्याची विनंती करण्यात आली, ज्यावर संसदेने हा विषय गांभीर्याने ऐकला आणि पुढील चर्चेनंतर, येत्या संसद अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करण्याचे आश्वासन दिले । बैठक मध्ये एलजीबीटी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सेल अध्यक्ष प्रिया पाटिल , कामगार नेते रमेश भारती , वसई विरार पदाधिकारी नालासोपारा विधानसभा अध्यक्ष

चंद्रकांत कदम ,मा.सरचिटणीस हरीश कोटकर, अल्पसंख्यक जिल्हा अध्यक्ष असलम खान , युवक जिल्हा अध्यक्ष योगेश पंधेरे , युवक कार्याध्यक्ष श्रीधर पाटिल , सरचिटणीस रोहित ससाने , ८४ वार्ड अध्यक्ष आसिफ इकबाल , जिल्हा मीडिया प्रमुख कमर बेग व कार्यकर्ता उपस्थित होते ।

## ड्रग्ज फॅक्टरी प्रकरणः आदिवासी जमिनीवर उभारलेल... पान नं.४

आहेत. संबंधित विभागांकडून मात्र 'प्रकरण तपासाधीन असून कायद्यानुसार आवश्यक कार्यवाही केली जाईल' अशी प्रतिक्रिया मिळाली आहे.या घटनेमुळे आदिवासी बांधवांच्या हक्काच्या जमिनीवर होणाऱ्या अतिक्रमणांचा आणि प्रशासनाच्या प्रतिसादाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नागरिकांकडून या प्रकरणाची सखोल चौकशी करून बेकायदेशीर बांधकामे हटविण्याची व जमिनीचा ताबा मूळ हक्कदारांकडे परत देण्याची मागणी होत आहे.

MEDIA PARTNER
FS Fashion Station
शिवांश न्युज
कामगार नेता
कामगार शक्ती न्युज

# हृदयविकार टाळण्यासाठी ३० ते ४० वयोगटातल्या लोकांनी 'ही' काळजी घ्या

गेल्या काही वर्षांमध्ये आधुनिक जीवनशैलीमुळे सर्वच आर्थिक-सामाजिक स्तरांमधील लोकांच्या आयुष्यात मोठे बदल झालेले दिसून येतात. यामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, लठ्ठपणा असे अनेक आजार सर्वच वयोगटातील लोकांमध्ये वाढलेले दिसत आहेत.

या जीवनशैलीविषयक आजारांमध्ये अनेक मानसिक आजार आणि मानसिक अवस्थांचाही समावेश आहे. कोरोनानंतरच्या काळात जीवनशैलीविषयक आजारांत मोठी वाढ झालेली आहे. हृदयरोगाचं प्रमाण एकेकाळी ५० ते ६० वयोगटापलिकडच्या लोकांमध्ये असे मात्र आता ते हळूहळू खाली येत तरुणांमध्येही हृदयरोगाच्या धक्क्याचं प्रमाण वाढलेलं दिसतं. हृदयरोगाच्या या संकटाला वेळीच ओळखून ३०-४० वयोगटातील लोकांनी काय करणं गरजेचं आहे ते आपण पाहू.

तारुण्यात हृदयविकार होऊन अकाली मृत्यू येणं यामागे बदलती जीवनशैली, लठ्ठपणा, व्यायामाचा अभाव ही मोठी कारणं असावीत असं तज्ज्ञ सांगतात मात्र यासर्व गोष्टींची काळजी घेणारी व्यक्ती सर्व रोगांपासून पूर्ण मुक्त असेलच असं नाही. कोणत्याही व्यक्तीला हृदयविकाराचा धक्का आणि आरोग्याच्या इतर समस्या भेडसावू शकतात.

अकाली मृत्यूची कारणे शोधण्यासाठी सरकार आणि यंत्रणेने योग्य विश्लेषण केले पाहिजे आणि आवश्यक तेथे शवविच्छेदन केले पाहिजे. त्यानंतरच या प्रकारच्या मृत्यूची खरी कारणे समोर येऊ शकतात आणि त्याचा अभ्यासही लोकांसाठी उपयुक्त करू शकतो. असं तज्ज्ञ सुचवतात.

हृदयविकाराचा झटका येण्याची बरीच कारणं आहेत. त्यात हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्ताच्या धमन्यांमध्ये फॅट जमा (कॅल्शियम कमी असल्याने) झाल्यामुळे हृदयाला होणारा रक्तपुरवठा खंडित होतो. अशा परिस्थितीत, रक्तवाहिन्यांमधील अडथळा वेळेवर दूर केला नाही तर शरीरात ऑक्सिजनची कमतरता निर्माण होते. आणि छातीत वेदना जाणवू लागतात. यालाच हृदयविकाराचा झटका म्हणतात आणि तो जीवघेणा ठरू शकतो.

पण कधीकधी ॲसिडिटी किंवा गॅसेसच्या त्रासामुळे देखील आपल्याला अस्वस्थ वाटू शकतं. हाच त्रास असेल असा गैरसमज होऊन लोक या दुखण्याकडे दुर्लक्ष करतात. अशा वेळी योग्य उपचार न मिळाल्याने लोकांना जीव गमवावा लागल्याची अनेक प्रकरणे आहेत. त्यामुळे डॉक्टर ईसीजी करण्याचा सल्ला देतात.

अहमदाबादच्या चौधरी हॉस्पिटमधील तज्ज्ञ डॉ. मुकेश चौधरी यांच्या मते, 'लहान वयात हृदयविकाराचा झटका येण्यामागे आहाराच्या सवयी आणि जीवनशैलीचा मोठा वाटा असतो.'

ते म्हणतात, 'अनेक वेळा आहारातील व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे हृदयाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. तसंच, हृदयाशी संबंधित समस्या पुढील काळात धोकादायक ठरेल, याचा अंदाज रुग्णाला सुरुवातीला येत नाही. त्यामुळे उपाचारात दिरंगाई होते.'

ते पुढे म्हणतात, 'अनेक वेळा कार्डिओग्राम सामान्य असू शकतो. हृदयाशी संबंधित समस्यांचे निदान करण्यासाठी महत्त्वाची मानली जाणारी चाचणी म्हणजे अँजिओग्राफी. ही चाचणी वेळेवर होणं गरजेचं असतं.'

'कधीकधी हृदयविकाराचा झटका इतका तीव्र असतो की अँजिओग्राफीसाठी वेळच मिळत नाही. हृदयविकारासाठी योग्य वेळी योग्य उपचार करणं अत्यंत महत्त्वाचं असतं.'

३० ते ४० वयोगटातील लोकांनी आतापासूनच काय काळजी घ्यावी हृदयरोगापासून दूर राहाण्यासाठी आपण काही प्रयत्न आधीपासूनच करू शकतो. तिशी ओलांडलेल्या प्रत्येकानं याकडे गांभीर्यानं लक्ष दिलं तर एक चांगली जीवनशैली आपण आत्मसात करू शकू.

वोकहार्ट हॉस्पिटल्स, मुंबई सेंट्रल येथील हृदयरोगज्ज्ञ आणि शल्यचिकित्सक डॉ. गुलशन रोहरा यांनी यासंदर्भात अधिक माहिती दिली.

डॉ. रोहरा सांगतात, 'सध्याच्या काळात तारुण्यात येणाऱ्या हार्ट अटॅकमागे त्यांच्या कौटुंबिक इतिहासात मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदयाचे आजार असू शकतात. तसेच धूम्रपान, मद्यपान, बैठी जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि ताण ही सुद्धा कारणं आहेत.'

ते सांगतात, ईसीजी, टूडी एको आणि कोरोनरी अँजिओग्राफी या तीन चाचण्यांतून रुग्णाची स्थिती बहुतांश समजून येते आणि त्यावरुन या आजाराचं निदान केलं जातं.हृदयरोग टाळण्यासाठी डॉ. रोहरा जीवनशैलीतील बदलांवर भर देतात. ते सांगतात, 'प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुटुंबात जर जनुकीय आजार असतील तर ते माहिती पाहिजेत. तसेच दारू-सिगारेट सोडणं अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने नियमित व्यायाम म्हणजे किमान मिनिटं चालणं आवश्यक आहे. संतुलित आहार आणि दरवर्षी आरोग्याची तपासणी करणं आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे ताण टाळला पाहिजे.'

जर आहार आणि जीवनशैलीतील बदल आजपासूनच केले तर हृदयरोगाच्या संभाव्य शक्यतेला दहा ते पंधरा वर्षं पुढं ढकललं जाऊ शकतं. काही लोकांच्या बाबतीत तो पूर्णतः टाळलाही जाऊ शकतो. महिलांनीही एक चांगली जीवनशैली आत्मसात करावी आणि वेळेत चाचण्या कराव्यात असं डॉ. रोहरा सांगतात.

अचानक हार्ट अटॅक येण्याची कारणं?

बीबीसीशी बोलताना बॉम्बे हॉस्पिटलचे हृदयविकारतज्ज्ञ डॉ. लक्ष्मण खेराडे सांगतात, 'बी-१२ शरीरामध्ये कमी प्रमाणात असेल तर, रक्ताची गाठ तयार होते. रक्त घट्ट होण्याची शक्यता असते. ही गाठ हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये गेल्यास हार्ट अटॅक येतो. असं झाल्यास कार्डिॲक अरेस्टने रुग्णाचा मृत्यू होण्याची शक्यता असते.'

तज्ज्ञांच्या माहितीनुसार, काहीवेळा अचानक तयार झालेली रक्ताची गाठ डोक्यात जाते. पण, यात रुग्णाला अर्धांगवायूचा झटका येण्याची शक्यता असते.

'काही रुग्णांना त्यांना हृदयाचा आजार आहे याची माहिती नसतं. अशावेळी हृदयावर जास्त प्रेशर आल्याने हार्ट अटॅक येण्याची शक्यता असते, ' असं डॉ. खेराडे सांगतात.

# 'प्रभावी राजकीय प्रतिनिधित्वासाठी जैन युवकांनी एकत्र येणे ही काळाची गरज' — परमपूज्य प्रवीणऋषीजी महाराज

पुणे महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या पूर्वतयारीच्या पार्श्वभूमीवर जैन समाजाचे संघटित आणि प्रभावी राजकीय प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने 'पुणे सकल जैन समाज मेळावा' उत्साहात पार पडला. मेळाव्यास दीड हजार हून अधिक जैन अनुयायांनी हजेरी लावली.

हा मेळावा उपाध्याय प्रवर परमपूज्य प्रवीणऋषीजी महाराज यांच्या पावन सानिध्यात, अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघ यांच्या वतीने वर्धमान सांस्कृतिक भवन, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्यात जैन समाजातील विविध संघटना, संस्था, ट्रस्टचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच असंख्य युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. समाजाच्या राजकीय सहभागाची दिशा, एकजूट आणि आगामी निवडणुकांमधील जैन समाजाचा प्रभावी सहभाग या विषयांवर सखोल चर्चा झाली.

'जैन समाजाची संघटित शक्ती आणि युवकांचा सक्रिय राजकीय सहभाग हे समाजाच्या सशक्त भविष्यासाठी अत्यावश्यक आहे तसेच धर्मापेक्षा पक्ष मोठा नाही, जैन समाजातील जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी पण सर्वांनी प्रयत्न करूया असल्याचे मत आयोजक आदिनाथ स्थानकवासी जैन ट्रस्ट चे अध्यक्ष अनिल नहार, जैन अल्पसंख्यांक महासंघ चे राष्ट्रीय महामंत्री संदीप भंडारी आणि प्रदेश वरिष्ठ उपाध्यक्ष महेंद्र सुंदेचा मुथ्था यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात माजी मंत्री राजेंद्र बाबू दर्डा, विजय भंडारी, अभय छाजेड, अनिल नहार, इंदर छाजेड, सुनील लोढा, लक्ष्मीकांत खाबिया, बाळासाहेब ओसवाल, प्रविण चोरबोले, राजेंद्र बाटीया, हरेश शहा, प्रशांत देसरडा यांनी इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन केले.

मेळाव्यादरम्यान विविध राजकीय पक्षांतील जैन समाजातील सर्वपक्षीय इच्छुक उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली

भारतीय जनता पक्षः महेंद्र सुंदेचा मुथा, प्रवीण चोरबोले, बाळासाहेब ओसवाल, आनंद छाजेड, भरत भुरट, विपेश सोनीग्रा, अरविंद कोठारी, प्रतीक देसरडा, राजू बाफना, कुंतीलाल चोरडिया, श्रीमल बेदमुथा, प्रकाश बाफना, प्रीती पाटील

काँग्रेसः भरत सुराणा, आनंद बाफना, योगिता सुराणा, अरुण कटारिया

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट): निलेश शहा, प्रशांत गांधी

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): जया बोरा, सुवर्ण कोठारी

शिवसेना (एकनाथ शिंदे गट): रिषभ नानावटी

मनसेः ऋषभ सिंगवी

अपक्षः निखिल मुनोत, हर्षदा मुनोत

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकाश बोरा, मयूर सरनोत, जिनेंद्र कावेडिया, विनोद सोळंकी, अभिजीत शहा, सौरभ धोका, निमेश शहा, सागर लुनिया, ऋषिकेश शहा, संतोष बोरा, आनंद गादिया, पंकज बाफना यांनी परिश्रम घेतले.प्रस्ताविक व सूत्रसंचालन संदीप भंडारी यांनी केले तर आभार प्रदर्शन महेंद्र सुंदेचा मु मुथ्था यांनी केले.

कार्यक्रमासाठी महत्त्वपूर्ण सहकार्य दिल्याबद्दल आदिनाथ स्थानकवासी जैन ट्रस्टचे विशेष आभार मानण्यात आले.मेळाव्यातील वातावरण जैन समाजाच्या एकतेचा, संघटित शक्तीचा आणि आगामी निवडणुकांमध्ये प्रभावी प्रतिनिधित्व घडविण्याच्या दृढ निर्धाराचा साक्षीदार ठरले.

# वसई–विरारमध्ये भूमाफियांचा धुमाकूळ! प्रशासनाच्या डोळयांदेखत बेकायदेशीर बांधकामाचा उघडपणे खेळ



वसई–विरार (प्रतिनिधी): वसई–विरार शहर महानगरपालिकेच्या वालीव प्रभागातील सर्वे क्रमांक १५६/३ अथवा १५६/४ मधील सरकारी जमिनीवर भूमाफिया राधेश्याम यादव याने उघडपणे अनधिकृत बांधकामाचा मोठा गोरखधंदा सुरू केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.सणासुदीच्या सुट्ट्यांचा गैरफायदा घेत, रात्री-दिवस गाळे व चाळी उभारण्याचे काम सुरू असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

प्रिया फाउंडेशनने या बेकायदेशीर कृत्याचा तीव्र निषेध व्यक्त करत, महापालिका आणि पोलिस प्रशासनाकडे सविस्तर लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, भूमाफिया यादवने फाउंडेशन टाकून गाळे आणि चाळींचे बांधकाम सुरू केले आहे.

शनिवार–रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये हे काम रात्रंदिवस सुरू ठेवून प्रशासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे.या बेकायदेशीर कृतीमुळे शासनाचा महसूल बुडतो आहे आणि भूमाफियांचा मनोबल वाढत आहे, असा गंभीर आरोप प्रिया फाउंडेशनकडून करण्यात आला आहे.प्रिया फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा प्रिया भट्टाचार्य यांनी सांगितले,'सुप्रीम कोर्टाचे स्पष्ट आदेश आहेत की अनधिकृत बांधकामांना घरपट्टी, पाणीपट्टी आणि वीज कनेक्शन देऊ नये.

तरीही स्थानिक प्रशासन जाणीवपूर्वक या प्रकरणांकडे दुर्लक्ष करत आहे.हे आदेशांचा अवमान असून लोकशाहीवर थेट प्रहार आहे.''जेव्हा प्रशासन माफियांना पाठीशी घालते, तेव्हा नागरिकांचा कायद्यावरील विश्वास ढळतो.

ही न्यायव्यवस्थेचा अपमान करणारी स्थिती आहे आणि आम्ही यावर कायदेशीर लढा देणार आहोत.'प्रिया फाउंडेशनने या संदर्भात मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक, कोकण विभागाचे पोलीस आयुक्त, परिमंडळ–२ चे उपायुक्त, तसेच वसई–विरार महानगरपालिकेचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, एळण विभागप्रमुख आणि वळीव प्रभागाचे सह–आयुक्त यांना सविस्तर लेखी तक्रारपत्र सादर केले आहे.या अनधिकृत बांधकामावर तात्काळ तोडक कारवाई करण्यात यावी.

भूमाफिया राधेश्याम यादव याच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी.

संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून विभागीय कारवाई करण्यात यावी.

'जर या प्रकरणावर तात्काळ आणि ठोस कारवाई झाली नाही,

तर प्रिया फाउंडेशन कायद्याच्या चौकटीत राहून जनआंदोलन उभारेल आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात न्यायालयीन लढा देईल.'

अशा स्पष्ट शब्दांत प्रिया फाउंडेशनने प्रशासनाला इशारा दिला आहे.भूमाफियांच्या या बेकायदेशीर कारवायांमुळे वसई–विरारमधील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रशासनाने यापुढे दुर्लक्ष केल्यास, जनतेचा कायद्यावरील विश्वास कोसळेल आणि नागरिकांना रस्त्यावर उतरावे लागेल, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# निवडणुकांबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पार्टी कार्यकर्त्यांसोबत प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक सम्पन...

## जिल्हा मीडिया प्रमुख कमर बेग यांनी खासदार सुप्रिया ताई सुळे यांच्याशी चर्चगेट ते विरार एलिवेटेड रेल्वे कॉरिडॉरचा मुद्दा संसदेत उपस्थित करण्याबाबत चर्चा केली

मुम्बई । राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार पार्टी, पक्षप्रमुख शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या उपस्थितीत, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, मुंबईतील प्रसिद्ध वायबी सेंटर हॉलमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक सम्पन्न झाली. उपस्थित प्रमुख पक्ष नेत्यांमध्ये पक्षाध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, खासदार बाल्यामामा, आमदार जितेंद्र आव्हाड आणि अनेक वरिष्ठ नेते



होते ज्यांनी पक्ष अधिकाऱ्यांच्या चिंता गांभीर्याने ऐकल्या आणि त्यावर चर्चा केली। दरम्यान, वसई विरार शहर मीडिया प्रमुख कमर बेग यांनी खासदार सुप्रिया ताई सुळे यांच्याशी चर्चगेट ते विरार एलोवेटेड रेल्वे कॉरिडॉरच्या

पान नं.२वर







## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय– ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

# ड्रग्ज फॅक्टरी प्रकरण: आदिवासी जमिनीवर उभारलेले बांधकाम संशयाच्या भोव-यात

मुंबई पोलिसांनी अलीकडेच केलेल्या धाडीत उघडकीस आलेली कथित ड्रग्ज फॅक्टरी आता नव्या वादात सापडली आहे. ही फॅक्टरी वसई तालुक्यातील मौजे पेल्हार परिसरातील आदिवासी बांधवांच्या जमिनीवर उभारण्यात आल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिक व आदिवासी प्रतिनिधींनी केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित जमीन ही नवीन शर्तीने आदिवासी बांधवांना वाटप झालेली वन जमीन असल्याचे सांगितले जाते. तथापि, या जमिनीवर गाळे उभारण्यात आले आणि त्यानंतर वीज जोडणी व मालमत्ता कर नोंदीही करण्यात आल्या, असा दावा स्थानिकांनी केला आहे. या संदर्भात दि. २६ मार्च २०२४ रोजी वसई-विरार महापालिका आयुक्तांकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली होती, मात्र त्या तक्रारीवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याचे आदिवासी बांधवांचे म्हणणे आहे.दरम्यान, मुंबई पोलिसांनी सदर ठिकाणी ड्रग्ज निर्मिती संदर्भात छापा मारून तपास सुरू केला आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या ठिकाणी संशयित पदार्थांचे नमुने जप्त करण्यात आले असून प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.स्थानिक पातळीवर नागरिकांकडून महसूल, वन विभाग आणि महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात

पान नं.२वर

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in